जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २४.०६.२०२५**

'' डिजीटल अरेस्ट गुन्हयात फसवणूकीची रक्कम क्रिप्टो करन्सी (VDA) माध्यमातून परदेशात पाठविणाऱ्या टोळीचा पर्दापाश ''

ऑनलाईन आर्थिक फसवणूक संदर्भातील दाखल गुन्हयाचे प्रमाणात वाढ होत आहे. सद्यस्थितीत सायबर गुन्हेगार हे शासकीय अधिकारी असल्याचे भासवून, सर्वसामान्य नागरिकांना डिजीटल अरेस्टची धमकी देवून ऑनलाईन फसवणूकीचे गुन्हे करीत आहेत. ठाणे नगर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ७७६/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३१६(५), ३३६(३), ३४०(२) सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(डी) अन्वये दाखल गुन्हयात फिर्यादी यांना त्यांचे मोबाईलवर फोन करुन त्यांनी DHL कंपनीचे कुरिअर पार्सल पाठविल्याचे सांगुन संपर्क करुन त्याने पाठविलेल्या पार्सल सिज झाले आहे, त्यामध्ये १ लॅपटॉप, १४० ग्रॅम ए.डी.पावडर (अंमली पदार्थ) थाई पासपोर्ट, ३ क्रिडेट कार्ड, ४ किलो कपडे असल्याचे सांगुन सदर पार्सलशी तुमचा संबंध नसल्यास पोलीसांना कळवा असे सांगुन दुसऱ्या मोबाईलवरुन फिर्यादी यांचेशी व्हॉटसॲप व्हीडीओ कॉलद्वारे संपर्क साधुन सी.बी.आय अधिकारी असल्याचे भासवुन फिर्यादी यांना वेळावेळी कॉल करुन डिजीटल अरेस्ट केल्याचे सांगुन फिर्यादी यांना बनावट कागदपत्र पाठवुन त्यांचे बॅक खात्यात असलेली रक्कम आरोपी यांचे बॅक खात्यावर तपासणीकरीता वळती करण्यास भाग पाडुन फिर्यादी यांचे स्टेट बॅक ऑफ इंडिया व बॅक ऑफ इंडिया खात्यामधुन आरोपी यांचे खात्यात एकुण ३,०४,००,०००/— रूपये रक्कम स्वत:च्या वेगवेगळया लाभधारक बॅक खातेदार यांचे खात्यावर वळती करून घेवून ती रक्कम फिर्यादी यांना परत न करता फिर्यादीचा विश्वासघात करून आर्थिक फसवणुक केली म्हणून गुन्हा नोंद आहे.

प्रस्तूत गुन्हयाचा तपास सायबर पोलीस ठाणे, ठाणे शहर यांचेकडून करीत असतांना सदर प्रकारचे गुन्हे करणारी टोळी आंतराष्ट्रीय स्तरावर सक्रिय असून आरोपीत तांत्रिकदृष्टया अद्यावत कार्यप्रणालीचा वापर करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तपासाधीन गुन्हयातील फिर्यादी यांची फसवणूक झालेल्या रकमेपैकी ८२,४६,०००/— रू.रक्कम आरोपीत १) किशोर बन्सीलाल जैन,वय ६३ वर्षे, व्यवसाय :— श्री.सत्कार पतपेढील चेअरमन, रा. रुम नं ३१, अहमद सेलर बिल्डींग नं ३, महात्मा जोतीबा फुले रोड, हिंदमाता सिनेमा जवळ, दादर, मुंबई ४०००१४१४, २) महेश पवन कोठारी, वय ३६ वर्षे, व्यवसाय :— गारमेंट व इमीटेशन ज्वेलरी राह. ५०२, औरम अपार्टमेंट, वाकोला मशिदचे समोर, सांताक्रुझ पुर्व मुंबई नं. ५५, ३) धवल संतोष भालेराव, वय २६ वर्षे, व्यवसाय :— कॉस्मेटीकचा व्यवसाय, राह. एच.डी.आय.एल. धिरज ड्रीम, १डी/२०२, भांडूप रेल्वे स्टेशन जवळ, भांडूप (प) मुंबई नं. ७८ यांनी युएसडीटी (VDA) द्वारे परदेशात पाठविल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १९/०६/२०२५ रोजी वा. १९:५० अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीतांची पोलीस कस्टडी रिमांड घेवून, अधिक तपास करीत आहोत. गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश वारके, सायबर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा/सायबर श्री.पराग मणेरे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा/सायबर श्री.दत्तात्रय पाबळे, सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/प्रकाश वारके, पोनि/सुदेश आजगांवकर, पोनि/प्रियंका शेळके, सपोनि मंगलसिंग चव्हाण, सपोनि/प्रदिप सरफरे, सपोनि चेतन पाटील, ग्रेडपोउपनि अविनाश बाबरेकर, मपोहवा/वर्षा माने, पोशि/दिपक खोत, पोशि/जालिंदरनाथ डावरे, पोशि/विजय पाटील, पोशि/प्रविण आव्हाड, पोशि/राजेंद्र नेगी, पोशि/प्रविण इंगळे यांनी केलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर